# जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यांत येते की, तुकडी पुणे पोट तुकडी ता.हवेली, जि.पुणे व पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे येरवडा येथील स.नं.१०२ब(पार्ट) म्हणजेच सिटीएस नं.२०६५ ही मिळकत श्री.फिरोज ए.इराणी यांच्या मालकीची असून मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी १२९६.४० चौ.मी. क्षेत्र पुणे मनपाच्या विकास आराखडयानुसार ६० मीटर डीपी रस्त्यासाठी आरक्षित आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालकांचे वतीने त्यांचे कुलमुखत्यार श्री.संदिप पी.पटेल यांनी सदर आरक्षित क्षेत्राच्या मोबदल्यात हस्तांतरणीय विकसन हक्क (टीडीआर) मिळणेकामी पुणे महानगरपालिकेकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे.

सदर मिळकतीचे विद्यमान मालक व त्यांचे कुलमुखत्यार यांनी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची, नागरी जमीन (कमाल) धारणा कायदयाचे अंतर्गत फ्रीहोल्ड असल्याची तसेच त्यांना हस्तांतरणीय विकसन हक्क (टीडीआर) प्राप्त करून घेण्याचे हक्क व अधिकार असल्याची खात्री व भरवसा आम्हांस दिला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीन, लीज, बक्षिस, ताबा, पोटगी, दावा, कूळ, खंड, साठेखत, खरेदीखत इ.कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आंत आमचेकडे समक्ष येवून मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून दयावी.

येणेप्रमाणे मुदतीत न केल्यास सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला असल्याचे समजण्यात येवून सदर मिळकतीचे आरक्षित क्षेत्राच्या मोबदल्यात हस्तांतरणीय विकसन हक्क (टीडीआर) वर नमूद मिळकतीच्या विद्यमान मालक श्री.फिरोज ए.इराणी यांचे नावाने देण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

पुणे
दिनांक १४/२/२००८

(ॲड.भाग्यश्री अलाटे)
ॲडव्होकेट व विधी सल्लागार

पुणे महानगरपालिका भवन
शिवाजीनगर,पुणे-५